ह. व्या. प्र. मंडळाच्या अभियांत्रीकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाव्दारा पिंपळगाव बैनाई येथे चार ते बारा जानेवारी 2020 ला विशेष शिबीर आयोजीत करण्यात आले होते. शिबीराचा विषय "Technological Intervention for Hygiene, Defection Free Village and Water recycle, reuse and Conserve " हा होता या विषयावर आधारित तिन महत्वपुर्ण प्रकल्प पथकाने हाती घेतले. जे खालील प्रमाणे आहेत.

1. पथदर्शी जूडे स्वच्छता गृह बाथरूम प्रकल्प
2. जैव –इंधन प्रकल्प
3. दुचाकी वाहनांची दुरूस्ती प्रशिक्षण शिबीर

दिंनांक 04.01.2020 ला 3 वाजता रा.से.यो. पथक ह.व्या.प्र. मंडळाचे अभियात्रींकी व तांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणातुन निघाले दुपारी 4 च्या सुमारास पिपंळगाव बैनाई या दत्तक ग्रामी पोहचले. गावातील सरपंच सौ. शरयुताईपंडित व गावातील ग्राम पंचायत सद्स्य व इतर गावकर–यांशी भेट घेतली. मुला–मुलींच्या राहण्याची व्यवस्था व परिसर स्वच्छता केल्या नंतर प्रकल्पाची पाहणी करण्यात आली. व दुस–या दिवसाच्या कामाचे नियोजन करण्यात आले.



**पहिला दिवस**

दिनांक 05.01.2020 हा शिबीराचा पहिला दिवस होता. शिबीराची सुरूवात योगासन व भारतीय पंरपरागत खेळाने करण्यात आली. त्यानंतर सकाळी 8 वाजता प्रभातफेरी काढण्यात आली. याच उद्दीष्ट ग्राम प्रबोधन व शिबीराची माहिती देण्यात आली.



सकाळी 11 वाजता शिबीराचे उद्धाटन समारंभ आयोजीत करण्यात आले होते. शिबीराचे अध्यक्ष डॉ ए. बी. मराठे, प्राचार्य ह.व्या.प्र.मं अभियात्रीकी महाविद्यालय होते. उद्धाटक म्हणुन डॉ. अडवानी व डॉ. सुने लाभले होते. श्री. श्रीपाद ढोले, डॉ. व्ही. एल. अग्रवाल, डॉ. कलोती आदी मान्यवर उद्धाटन समारंभासाठी उपस्थीत होते. कार्यक्रमाचे आयोजन रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक एस. यु. बन्दे, प्रा. पि. यु. ईश्वरकर महिला कार्यक्रम अधिकारी, प्रा. एन. ए राठोड सह–कार्यक्रम अधिकारी व रा.सेयो. स्वंयसेवकांनी केले होते. उद्धाटनानंतर कर्करोग आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये गावक–यांचा उत्पुर्त प्रतिसाद लाभला. बौद्धीक सत्रामध्ये श्री. अनंत खांडे यांनी ''युवकांचे ध्येयांवरिल प्रेम'' या विषयावर मार्गदर्शन केले. दिवसाची सांगता सांस्कृतिक कार्यक्रमाने झाली.




महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना
उपलब्ध सुविधा :
सर्जिकल ऑन्कॉलॉजी (सर्जरी), किमोथेरेपी
उपलब्ध आहे.




Sponsored By
GOVT. OF INDIA & MHRD
Under
Unnat Bharat
Abhiyan
Year - 2019-2020
विशेष
शिबीर

**<u>दुसरा दिवस</u>**

दिनांक 06.01.2020 दिवसाची सुरूवात योगासन व भारतीय परंपरागत खेळाने झाली. सकाळी 9 ते दुपारी 1 या वेळा मध्ये रासेयो स्वयंसेकांनी श्रमदान केले.





त्यांनंतर बौद्धीक सत्रामध्ये डॉ. यु. ए. बेलोरकर यांनी उन्नत भारत अभियान व त्यांच्या अर्तगत येणारे विविध प्रकल्प जे ह. व्या. प्र. महाविद्यालयाने राबविले व माहिती मार्गदर्शन केले. दिवसाचा शेवट सांस्कृतिक कार्यक्रमाने झाली.




**<u>दिवस तिसरा</u>**

दिनांक 07.01.2020 दिवसाची सुरूवात योगासन व पारंपारीक खेळाणे करण्यात आली. सकाळी 9 ते 1दरम्यान रासेयो स्वयंसेवकानी श्रमदान केले. त्यांनंतर दुपारच्या सुमारास बौद्धीक स़त्र घेण्यात आले. त्याला डॉ. दया पांडे हे वक्त्या लाभल्या व त्यांनी ''स्वच्छता व पर्यावरण Vision 2020'' या विषयावर मार्गदर्शन केले नंतर सांयकाळी प्रार्थना व त्यांनतर सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला कार्यक्रम होत असताना पिदडी सर यांनी भेट दिली व मार्गदर्शन केले व त्याच बरोबर श्री नवनाथ गायकवाड यांनी मानवातील संमोहन या विषयावर कार्यक्रम सादर करून दिवसाची सांगता झाली.








<u>**दिवस चवथा**</u>

दिनांक 08.01.2020 रोजी दिवसाची सुरूवात योगासन व सांस्कृतिक कार्यक्रमाने झाली. सकाळी 9 ते 1 वाजेपर्यत श्रमदान करण्यात आले. त्यांनंतर दुपारी 2 ते 3 उन्नत भारत तर्फे ग्राम कुंटुंब सर्वेक्षण करण्यात आले. त्यानंतर दुपारी 3 ते 5 बौद्धीक सत्र घेण्यात आले. त्यात वक्ते श्री. प्रविन गुल्हाने यांनी ‘‘आधुनिक आदर्श ग्राम‘‘ यावर मार्गदर्शन केले. त्यांनतर दिवसाची सांगता सांस्कृतिक कार्यक्रमाने करण्यात आली.



<u>दिवस पाचवा</u>

दिनांक 09.01.2020 दिवसाची सुरूवात योगासन व भारतीय पारंपारिक खेळाने करण्यात आली. त्यांनंतर 9 ते 1 वाजेपर्यंत श्रमदान करण्यात आले. त्यांनंतर सांयकाळी मान्यवराच्या हस्ते बायोगॅस प्रकल्प व पथदर्शी जुडे स्वच्छतागृह यांचे लोकार्पण करण्यात आले. दुचाकी दुरूस्ती, कौश्यल्य प्रशिक्षणाच्या विद्यार्थ्याना प्रमाणपत्र देण्यात आले. Director - Innovation, Incubation & Linkages Sant Gadge Baba Amravati University Amravati, डॉ. डि. टी. इंगोले हयांनी प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी शिबीराला सदिच्छा भेट दिली या लोकार्पण सोहळयासाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, कुलसचिव मा. डॉ. तुषार देशमुख, ह.व्या.प्र. मंडळाचे अभियांत्रीकी व तांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. डॉ. अनंत मराठे, उन्नत भारत अभियानाच्या क्षेत्रीय समन्वयक डॉ. अर्चना बारब्दे तसेच गावच्या सरपंचा सौ शरयुताई पंडित व प्रतिष्ठित नागरीक अजय पंडित हे उपस्थीत होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्गिताने झाली.















**<u>दिवस सहावा</u>**

दिनांक 10.01.2020 रोजी दिवसाची सुरूवात ही योगासन व भारतीय पंरपरागत खेळ घेवुन करण्यात आली त्यांनतर 9 ते 1 श्रमदान करण्यात आले व दुपारी 2 ते 3 उन्नत भारत अभियान अर्तंगत ग्राम सर्व्हेक्षण करण्यात आले व त्यांनतर दुपारी 3 ते 5 बौद्धीक सत्र घेण्यात आले त्यामध्ये श्री. सत्यम वानखडे यांनी “ व्यसनमुक्ती व आरोग्य “ या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.



त्यानंतर डॉ. अतुल साळुंके रासेयो विशेष अधिकारी, महाराष्ट् शासन व राजेश बुरंगे प्रसंचालक रासेयो संगाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी शिबीराला भेट दिली. कार्यक्रमाची सांगता सांस्कृतिक कार्यक्रमाने करण्यात आली.




Shot on realme 3 Pro
By Ankits Photography


Shot on realme 3 Pro
By Ankits Photography


Shot on realme 3 Pro
By Ankits Photography

**<u>दिवस सातवा</u>**

दिनांक 11.01.2020 रोजी दिवसाची सुरूवात योगासन व भारतीय परंपरागत खेळाने करण्यात आली. सकाळी 9 ते 1 प्रकल्पावर श्रमदान करण्यात आले. त्यानंतर दुपारी 2 ते 5 शिबीराचा समारोप करण्यात आला.





